माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२१३२**

**अपिलार्थी श्री. चंद्रकांत लक्ष्मीनारायण करवा**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक**
नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर, तहसिलदार कार्यालयाचे आवार,
सरोजिनी नायडू मार्ग रोड, मुलुंड (प),
मुंबई- ४०००८०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी**
नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर, तहसिलदार कार्यालयाचे आवार,
सरोजिनी नायडू मार्ग रोड, मुलुंड (प),
मुंबई- ४०००८०

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.११.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.०५.२०२३ | ३१.०५.२०२३ | १९.०७.२०२३ | २५.०८.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.११.२०२३ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १८.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.२५.०८.२०२३ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १८.०५.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(अ) "घाटकोपर किरोळ येथील सर्व्हे नंबर असलेल्या व ते सर्व्हे नंबर आपल्या अखत्यारीतील नगर भुमापनास लागु झालेल्या, रुपांतरीत झालेल्या दि. ०१.०१.१९४९ ते आजपर्यंतचे त्या मिळकतींचा तपशिल मिळावा. (ब) वर कलम ३ (अ) मधील कालावधीची आपले कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्यास मी माहिती नस्तीबंध केल्यानंतर मी आपले कार्यालयामार्फत नष्ट केल्यासंबंधी आपले कार्यालयाने त्याबाबतचे ज्या रजिस्टरला नोंद केली आहे त्या रजिस्टरची प्रत मिळावी."*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. १९.०७.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०८.२०२३ रोजी आदेशात नमुद केले की, जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना कळविले आहे की, आपण न.भू. घाट-किरोळ या गावचे सर्व्हेनंबरचे नगर भूमापनास लागू झालेल्या रुपांतरीत झालेल्या मिळकतीची माहिती मिळणेबाबतची मागणी केलेली आहे. आपण इकडील कार्यालयात कमी जास्त पत्रक उपलब्ध असून कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून, उपलब्ध कमी जास्त पत्रक अवलोकन करुन, आपणास आवश्यक आलेली माहितीबाबत माहिती अधिकार फी चा भरणा करुन, माहिती प्राप्त करुन घ्यावी. ही विनंती. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहितीसाठी आवश्यक असलेली फी चा भरणा करुन माहिती प्राप्त करावी.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी सादर केले की, त्यांच्या कार्यालयात मागणी केलेली माहितीपैकी कमी जास्त पत्रक उपलब्ध असून आवश्यक असलेली माहिती, माहिती अधिकार फी चा भरणा करुन प्राप्त करावी असे अपिलार्थींना कळविले आहे. परंतु, अपिलार्थींनी कार्यालयाशी संपर्क केलेला नाही.

५. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★ सत्यमेव जयते

प्रदीप व्यास 6-11-2025

**मुंबई**
**दिनांक : ०६.११.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**